36

**सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,**

**यांचे कार्यालय.**

**नवीन मध्यवर्ती इमारत, तिसरा मजला, पुणे-४११००१.**

**दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६/४७** **Email : commcoop२०११@gmail.com**

जा.क्र.निवडणूक/१६-सआ/कलम २६ व २७ अंमलबजावणी/११७/२०१८ दि.:- १८/०५/२०१८.

**प्रति,**

१. **विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था (सर्व).**

२. **जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, (सर्व).**

**विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २६ व २७ च्या अंमलबजावणी बाबत.**

संदर्भ :- सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे परिपत्रक क्र.रासनिप्रा/मतदार यादी/अद्ययावतीकरण/आदेश/२८३४/२०१६, दिनांक ७ मे २०१६.

उपरोक्त विषयाचे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २६ मध्ये सहकारी संस्थेच्या सभासदांची कर्तव्ये विहीत करण्यात आली आहेत. कलम २६ (२) अन्वये प्रत्येक सभासदाने सलग पाच वर्षाच्या कालावधीत किमान एका सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे तसेय संस्थेच्या उपविधीत विहित केल्यानुसार सलग पाच वर्षांच्या कालावधीत किमान एकदा तरी संस्थेशी व्यवहार केला पाहीजे अथवा सेवा घेतली पाहीजे हे अनिवार्य करण्यात आलेले आहे. तसेच जे सभासद या दोन अटींची पूर्तता करीत नसतील त्यांना अक्रियाशील सभासद म्हणून घोषीत करण्याची व त्या सभासदाला आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० दिवसाचे आत नमुना 'डब्ल्यू' मध्ये त्याला अक्रियाशील सभासद घोषीत करण्यात आल्याचे कळविण्याची जबाबदारी संस्थेवर टाकण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारे घोषीत केल्यानंतरही पुढील पाच वर्षात तो सभासद या अटींची पूर्तता करीत नसेल तर त्याला कलम ३५ अन्वये काढून टाकण्याची देखील तरतूद केलेली आहे.

अशा प्रकारे अक्रियाशील सभासद म्हणून घोषीत करण्याचे कळविण्यात आल्या पासून असा सभासद निबंधकाकडे ६० दिवसाचे आत अपिल दाखल करेल अशीही तरतूद करण्यात आलेली आहे.

Scanned by CamScanner

२. कलम २७ (१-अ) नुसार अक्रियाशील सभासदाला मतदानाचा अधिकार असणार नाही अशी तरतूद आहे म्हणजे त्याचे नाव मतदार यादीतून वगळावे लागेल व तो समिती सभासदत्वा साठीही निवडणूक लढविण्यास अपात्र राहील.

३. नियम ३३ अन्वये प्रत्येक संस्थेने कलम ३९ मध्ये म्हटल्यानुसार 'जे' नमुन्यातील सभासद यादीसोबतच्या ('जे-१-''जे-२') या नमुन्यातही क्रियाशील व अक्रियाशील सभासदत्वाची नोंद ठेवणे अनिवार्य आहे.

४. नियम ६७ अन्वये आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याचे आत नमुना 'वाय' इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये माहिती सादर करणे बंधनकारक आहे. नमुना 'वाय' मधील अनुक्रमांक १२ वर क्रियाशील व अक्रियाशील सभासदांच्या यादीबाबतची माहिती विहीत केलेली आहे.

५. या संदर्भात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे परिपत्रक क्र.रासनिप्रा/मतदार यादी/अद्ययावतीकरण/आदेश/२८३४/२०१६, दिनांक ७ मे २०१६ व त्यासोबत दिलेले विवरण पत्र वाय-१२' कृपया पहावे. सदरच्या परिपत्रकात दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक संस्थेकडून विवरण पत्रात भरुन माहिती घेतलेली असल्यास त्यावरुन संकलन करुन सोबतच्या नमुन्यात संस्था प्रकार निहाय/तालुका निहाय/जिल्हा निहाय/विभाग निहाय आकडेवारी १५ दिवसात **http://tinyurl.com/y8vtagps** या लिंकवर दिलेल्या एक्सेल शीटमध्ये भरावी.

अपर निबंधक (सर्वसाधारण)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

माहितीस्तव-
खाजगी सचिव, कक्ष.
पर्यवेक्षकीय अधिकारी.
सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,म.रा.पुणे.

Scanned by CamScanner